**MHCH**170008462022

**न्यायनिर्णय नि.क्र.१० पुढे.**

(जाहीर केल्याचा दिनांक ३० एप्रिल, २०२४)

१. प्रस्तुत प्रकरणात आरोपीवर महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ अन्वये दंडनीय अपराधाचा आरोप लावण्यात आला आहे. आरोपीचे विरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा आला नसल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे बयाण वगळण्यात आले.

२. अभियोग पक्षाचे कथन, साक्षीदारांचा पुरावा यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या अवलोकनार्थ उपस्थित झाले आणि त्यावर निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेद्वारे दिले आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दि.२७/०७/२०२२ रोजी १९.१५ वाजताचे दरम्यान मौजा प्रसाद चौक येथे आरोपी स्वतःचे फायदयासाठी पैशाची बाजी लावून कल्याण सटठापट्टी नावाचा जुगार खेळ खेळतांना आढळुन आल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २ | अंतिम आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करिताः–**

३. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच तेजस अजय शिरभय्ये यांना सा.क्र.१ म्हणून तपासले. सदरहु साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षदाराने दि.२७/०७/२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलविले नसल्याचे सांगीतले. तसेच त्यांच्या समक्ष पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केलेले नसल्याचे सांगीतले. सदरहु प्रकरणात आरोपीचा नमुद गुन्यात सहभाग असल्याचे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नसल्याने मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी बंडु संभा सिडाम यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) प्रमाणे महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ अ अन्वये दंडनिय अपराधाच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल बॉल पेन, सट्टापट्टी आकडे लिहीलेली चिठ्ठी निरुपयोगी असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

३. जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १,१५०/– अपील कालावधीनंतर शासन जमा करण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.

RATNAMALA VYANKATESH DAFREY

Digitally signed by RATNAMALA VYANKATESH DAFREY
Date: 2024.04.30 17:43:07 +0530

(र. व्य. डफरे)

दि.३०/०४/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

चिमूर चिमूर.